**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१, कार्यालय,**
**पिंपरी चिंचवड**
**प्रिमियर कंपनी शेजारी, पुणे मुंबई रस्ता,चिंचवड**
**पुणे. १९**
☎ ✉

जावक क्रमांक/ /२०२४, पिंपरी चिंचवड दिनांक /११/२०२४

## गावठी बनावटीचे पिस्तुल व जीवंत काडतुस बाळगणारा सराईत तडीपार गुन्हेगार आरोपीस संत तुकारामनगर पोलीस ठाणे तपास पथकाकडुन अटक.

## आरोपींचे ताब्यातुन एकुण ०१ गावठी बनावटीचे पिस्तुल व एक जीवंत काडतुस असा एकुण ५०,५००/-रूपये एकुण किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

पिंपरी चिचंवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत बेकायदेशीर अग्निशस्त्रे व दारूगोळा बाळगणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. श्री.विनयकुमार चौबे सा़ो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, श्री डॉ.शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, श्री वसंत परदेशी, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केले आहे. त्यानुसार आम्ही स्वतः तसेच सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग, सचिन हिरे यांनी अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार आम्ही संत तुकारामनगर पोलीस ठाणेचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोरख कुभांर, यांना सदरची मोहीम राबवुन कारवाई करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक ०१/११/२०२४ रोजी पिंपरी तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. शाकिर जिनेडी यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, एक रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार हा चिंचवड एम.आय.डी.सी मधील काला ग्रुप कंपनीचे पाठीमागील सध्या बंद असलेल्या बी.आर.टी. रोडवर सायं. १७/३० वाजताचे सुमारास कोणालातरी भेटण्यासाठी येणार आहे व त्याचेकडे गावठी बनावटीचे पिस्तुल आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने संत तुकारामनगर पोलीस ठाणे तपास पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी सापळा रचुन बातमी प्रमाणे एक इसम चिंचवड एम.आय.डी.सी मधील काला ग्रुप कंपनीचे पाठीमागील सध्या बंद असलेल्या बी.आर.टी. रोडवर डेड-एन्ड ला व रोडवर उभा राहुन कोणाची तरी वाट पाहत असल्याबाबत खात्री झाल्याने तपास पथकाने शिताफिने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पंकज दिलीप पवार वय – ३२ वर्षे, धंदा – काही नाही रा. अण्णासाहेब मगर झोपडपट्टी, पिंपरी पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचे ताब्यात खालील वर्णनाचे एक गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत काडतुस मिळुन आले त्याचे वर्णन खालील प्रमाणे-

१) ५०,०००/- रू.किं.चे पांढऱ्या धातूचे मॅगझिनसह असलेले गावठी पिस्तुल, त्या पिस्तुलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस राखाडी रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यास पांढऱ्या धातूचेच मॅगझिन असे जु.वा.किं.अं.
२) ५००/- रु. किं.चा एक जिवंत काडतुस (राऊंड) जु.वा.किं.अं.

---------------

५०,५००/-                     सदर बाबत संत तुकारामनगर पोलीस ठाणे येथे गुरजि नं ९९३/२०२४, भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२, ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---------------------------------------------------------------------ooo---------------------------------------------------------------

सदर कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त साो पिंपरी चिंचवड, मा.डॉ.शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा. श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, मा. श्री सचिन हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो. पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड, यांचे मार्गदर्शनाखाली गोरख कुंभार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संत तुकारामनगर पोलीस ठाणे, तपास पथकातील पो.उप निरीक्षक शाकिर जिनेडी, पो.हवा. ६७० महाजन, पो.हवा. ७९७ वारडे, पो.ना.१८८० मुजावर, पो.शि.२५७८ आचार्य, यांनी केली आहे.

**( स्वप्ना गोरे)**
पोलीसउप-आयुक्त, परि-०१
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय